
# स्वादिष्ट

# मालपोहा




# स्वादिष्ट

# मालपोहा

मराठी : अश्विनी बर्वे




एके काळची गोष्ट आहे, एका आई बरोबर सात लहान मुलगे होते - सात भुकेली लहान मुलं.





तिने पीठ, मीठ, साखर आणि लोणी घेतलं आणि त्याचा गोळा बनवू लागली. मग तिने सगळ्यात मोठ्या तव्यावर लोणी वितळवलं.




एक दिवस, आईने आपल्या सात भुकेल्या लहान मुलांसाठी एक मोठा मालपोहा करायला घेतला.

मग आईने मोठ्या आणि गरम
तव्यावर पीठ ओतलं. त्याचा एक मोठा
मालपोहा झाला - एक मोठ्ठा मालपोहा
– सात भुकेल्या छोट्या मुलांना
खाण्यासाठी.






सात छोटी मुलं मालपोहा होतांना पहात होते.

“आम्हांला भूक लागली आहे,” ते म्हणाले.


“मालपोहा कधी तयार होईल?”





आईने मालपोहा हलकेच वर उचलला आणि त्याच्या खाली बघितलं.

“बघा, तो हळू-हळू शिजून सोनेरी होत आहे,” ती म्हणाली.




"अरे नाही!“ आई म्हणाली. “मला त्याला आता उलटावं लागेल.मला त्याला हवेत उचलून उलटावं लागेल. म्हणजे त्याची दुसरी बाजू सुद्धा सोनेरी होईल. मग तो तयार होईल.




“तो खाण्यासाठी तयार आहे?” सात छोट्या मुलांनी विचारले.

"अरे बाप रे!" मालपोहाने विचार केला,
“मी दुसऱ्या बाजूला सोनेरी होण्याची
वाट बघायला नको. नाहीतर हे सात
भुकेली मुलं मला खाऊन टाकतील
आणि माझा शेवट होईल..






“मी इथून पळून जाईन,”
मालपोहाने विचार केला.
“मी या सात भुकेल्या छोट्या
मुलांपासून दूर पळून जाईन.”



आईने एका हाताने तवा उचलला
आणि मग मालपोहा उलटा केला.
मग आई मालपोहा पकडायला
तयार झाली.




मग एका बाजूला सोनेरी आणि
दुसऱ्या बाजूला पिवळा मालपोहा
आपल्या किनाऱ्याने घरंगळू लागला.




"ओह, नाही, आता काय होईल!”
मालपोहाने स्वतःला विचारलं.
मग मालपोह्याने तव्यावरून उडी
मारली आणि कोलांडी घेत
फरशीवर आला..

मालपोहा, दरवाज्यातून बाहेर आला
आणि सडकेवर पळू लागला.
“थांब!" आई ओरडली, मग ती
मालपोह्याला पकडण्यासाठी
धावली.
मग अधिक जोरात मालपोहा
घरंगळत सडकेवरून पळाला.




सात भुकेली छोटी मुलं सुद्धा आपल्या आईच्या मागे-मागे रस्त्यावर पळाले. “थांब!“ ते ओरडले. “आम्हांला तुला खायचं आहे.”

"अरे नाही!“ मालपोह्याने म्हटलं आणि मग अधिक जोरात पळू लागला.
“मी सात भुकेल्या छोट्या मुलांचे जेवण होवू इच्छित नाही.”






"अरे नाही!" मालपोहा म्हणाला. “कोणी मला खावं असं मला वाटत नाही. एक आई मला पकडू शकली नाही, सात छोटी मुलं पकडू शकले नाही, मी तुझ्या हातात सुद्धा येणार नाही.”





लवकरच मालपोहा एक माणसा समोरून जावू लागला. “थांब!” तो माणूस म्हणाला. “तू एक स्वादिष्ट मालपोहा दिसतो आहे, मी तुला खाऊ इच्छितो.”




मग मालपोहा जोरजोरात पळू लागला. तो माणूस, सात भुकेली छोटी मुलं आणि त्यांची आई यांच्या मागे मागे तो पळू  लागला. ते सगळेजण मोठ्या मालपोह्याच्या मागे धावत होते.


लवकरच मालपोहा एक मांजरा समोरून जावू लागला. “थांब!” ते मांजर म्हणालं. “तू एक स्वादिष्ट मालपोहा दिसतो आहे, मी तुला खाऊ इच्छितो.”






"अरे नाही!" मालपोहा म्हणाला. “कोणी मला खावं असं मला वाटत नाही. एक आई मला पकडू शकली नाही, सात छोटी मुलं पकडू शकले नाही, एक माणूस मला पकडू शकला नाही, मी तुझ्या हातात सुद्धा येणार नाही.”







मग मालपोहा जोरजोरात पळू लागला.
ते मांजर, तो माणूस, सात भुकेली छोटी
मुलं आणि त्यांची आई यांच्या मागे मागे
तो पळू लागला. ते सगळेजण मोठ्या
मालपोह्याच्या मागे धावत होते.



"अरे नाही!" मालपोहा म्हणाला. "कोणी मला खावं असं मला वाटत नाही. एक आई  मला पकडू शकली नाही, सात छोटी मुलं पकडू शकले नाही, एक माणूस मला पकडू शकला नाही, एक मांजर मला पकडू शकलं नाही. मी तुझ्या हातात सुद्धा येणार नाही."




लवकरच मालपोहा एक कोंबड्या समोरून जावू लागला. "थांब!" तो कोंबडा म्हणाला. "तू एक स्वादिष्ट मालपोहा दिसतो आहे, मी तुला खाऊ इच्छितो."




मग मालपोहा जोरजोरात पळू लागला.

मग मालपोहा जोरजोरात पळू लागला. तो कोंबडा, ते मांजर, तो माणूस, सात भुकेली छोटी मुलं आणि त्यांची आई यांच्या मागे मागे तो पळू लागला. ते सगळेजण मोठ्या मालपोह्याच्या मागे धावत होते.





लवकरच मालपोहा एक बदका समोरून जावू लागला. “थांब!” ते बदक म्हणालं. “तू एक स्वादिष्ट मालपोहा दिसतो आहे, मी तुला खाऊ इच्छितो.”

"अरे नाही!" मालपोहा म्हणाला. “कोणी मला खावं असं मला वाटत नाही. एक आई मला पकडू शकली नाही, सात छोटी मुलं पकडू शकले नाही, एक माणूस मला पकडू शकला नाही, एक मांजर मला पकडू शकलं नाही. एक कोंबडा मला पकडू शकला नाही, मी तुझ्या हातात सुद्धा येणार नाही.”




मग मालपोहा जोरजोरात पळू लागला. ते बदक, तो कोंबडा, ते मांजर, तो माणूस, सात भुकेली छोटी मुलं आणि त्यांची आई यांच्या मागे मागे तो पळू लागला. ते सगळेजण मोठ्या मालपोह्याच्या मागे धावत होते.





लवकरच मालपोहा एका गायी समोरून जावू लागला. “थांब!” गाय म्हणाली. “तू एक स्वादिष्ट मालपोहा दिसतो आहे, मी तुला खाऊ इच्छिते.” "अरे नाही!" मालपोहा म्हणाला. “कोणी मला खावं असं मला वाटत नाही. एक आई मला पकडू शकली नाही, सात छोटी मुलं पकडू शकले नाही, एक माणूस मला पकडू शकला नाही, एक मांजर मला पकडू शकलं नाही. एक कोंबडा मला पकडू शकला नाही, एक बदक मला धरू शकलं नाही, मी तुझ्या हातात सुद्धा येणार नाही.”






मग मालपोहा जोरजोरात पळू
लागला. ती गाय, ते बदक, तो
कोंबडा, ते मांजर, तो माणूस, सात
भुकेली छोटी मुलं आणि त्यांची
आई यांच्या मागे मागे तो पळू
लागला. ते सगळेजण मोठ्या
मालपोह्याच्या मागे धावत होते.



लवकरच मालपोहा एका डुकरा समोरून जावू लागला. “थांब!” ते डुक्कर म्हणालं. “तू एवढ्या घाईने कुठे जात आहे?” डुक्कराने विचारलं.







“मी एक आई, सात भुकेली छोटी मुलं, एक माणूस, एक मांजर, एक कोंबडा, एक बदक आणि एक गाय यांच्यापासून दूर पळत आहे,” मोठ्या मालपोह्याने म्हटलं. “त्या सगळ्यांना मला खायचं आहे, आणि मला नाही वाटत मला कोणी खावं असं.”


"अगदी बरोबर, त्यांनी तुला खाऊच नये," डुक्कर म्हणालं. मग ते ही मालपोह्याबरोबर पळू लागलं. "मी अशी गोष्ट पहिले कधीच ऐकली नाही."

लवकरच एक मालपोहा आणि डुक्कर एका नदीच्या किनारी गेले. "आता मी काय करू?" मालपोह्याने डुक्कराला विचारलं, "मी तर पोहू शकत नाही."






त्यानंतर डुक्कराने तोंड उघडलं आणि मालपोहा खाऊन टाकला. मालपोहा फारच स्वादिष्ट होता.



“पण मी पोहू शकतो,” डुक्कर म्हणालं. “तू माझ्या तोंडावर चढ. मी तुला नदी पार करून देतो.” मग मालपोहा डुक्कराच्या तोंडावर चढला.



अशा प्रकारे मोठ्या मालपोह्याचा अंत झाला.

आई आणि सात भुकेली छोटी मुलं, माणूस, मांजर, कोंबडा, बदक आणी गाय त्या मोठ्या मालपोह्याला पकडू शकले नाही.

समाप्त